**<u>प्रेसनोट</u>** **दि. 06/12/2025**

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून शासनाच्या सहकार विभागाकडून नेमणूक केलेले लिक्विडेटर व खाजगी व्यक्ती यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरूष, वय 61 वर्ष, धंदा व्यापार |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | 1)विनोद माणिकराव देशमुख वय 50 वर्ष,धंदा :-शासनाच्या सहकार विभागाकडून नेमणूक केलेले लिक्विडेटर रा.ठी.फ्लॅट नंबर 505, सिंहगड दर्शन सोसायटी, वडगाव खुर्द, धायरी फाटा, पुणे<br>2) भास्कर राजाराम पोळ 56 वर्षे, धंदा:-सरकारी पॅनल वरील ऑडीटर रा.ठि. सुश्रुत रेसिडेन्सी, बी 7, गजानन महाराज मंदिराजवळ, नर्हेगाव, पुणे. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | **रू. 8,00,00,000/- (आठ कोटी रूपये)** |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | **रू. 8,00,00,000/- (आठ कोटी रूपये) पैकी पहिला हप्ता रू. 30,00,000/- (तीस लाख रूपये)** |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | **रू. 30,00,000/- (तीस लाख रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 05/12/2025 |
| **सापळा दिनांक** | दि. 05/12/2025 |
| **ठिकाण** | तक्रारदार यांच्या कार्यालयासमोर रोडवर शनिवारपेठ, पुणे येथे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती निता मिसाळ,सहा.पोलीस आयुक्त,ला.प्र.वि,पुणे. (मो.क्र. 9822214414) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, पुणे (मो.क्र. 9552574140) |

**थोडक्यात माहिती :-**

तक्रारदार हे एकता सहकारी सोसायटी सर्वे नंबर 10 धनकवडी पुणे या सोसायटीचे नवीन सभासद आहेत तक्रारदारांसोबत इतर 32 नवीन सभासद आहेत की ज्यांनी 2005 मध्ये जुन्या सभासदाकडून नमूद सहकारी सोसायटीचे शेअर विकत घेऊन नवीन सभासदत्व घेतले होते. परंतु सन 2020 मध्ये मूळ सभासद आणि नवीन सभासद यांच्यामध्ये सभासदत्वावरून वाद होऊन तो वाद सहकार विभागाकडे गेल्यानंतर सहकार विभागाने नमूद सोसायटीवर प्रशासक नेमले. नेमलेल्या प्रशासकाने मूळ सभासद व नवीन सभासद यांच्याकडे चौकशी करून एक अहवाल सहकार विभागाकडे सादर केला त्या अहवालानुसार सहकार विभागाने ती सोसायटी लिक्विडेशनमध्ये काढल्याचे जाहीर केले. सहकार विभागाकडून नमूद सोसायटीवर 2024 मध्ये आरोपी लोकसेवक क्रमांक एक यांना लिक्विडेटर म्हणून नेमण्यात आलेले आहे.

तक्रारदार व इतर 32 नवीन सभासदांनी 2023 मध्ये त्यावेळी प्रशासक म्हणून असलेले आरोपी क्रमांक दोन यांच्या नावे अर्ज करून त्यामध्ये शेअर सर्टिफिकेट मिळावेत विनंती केली होती.आरोपी क्रमांक दोन यांनी त्या विनंती अर्जावर कार्यवाही करून तक्रारदार सोडून इतर 32 नवीन सभासदाचे अर्ज निकाली काढले परंतु तक्रारदार हे सुनावणीसाठी उपलब्ध नसल्याने त्यांचा विनंती अर्ज प्रलंबित ठेवला. सप्टेंबर 2025 मध्ये तक्रारदार त्यांच्या विनंती अर्जाबाबत आरोपी क्रमांक 2 तात्कालीन प्रशासक असलेले भास्कर पोळ यांच्याकडे जाऊन चौकशी केली असता त्यावेळी भास्कर पोळ यांनी तक्रारदार व इतर 32 सभासद यांना शेअर सर्टिफिकेट मिळवून देण्यासाठी स्वतःसाठी व सध्या लिक्विडेटर म्हणून कार्यरत असलेले आरोपी क्रमांक 1 देशमुख यांच्यासाठी 3 कोटी रूपयांची लाच मागत असल्याबाबत तसेच भविष्यात होणाऱ्या लिलाव प्रक्रियेमध्ये नमूद सहकारी सोसायटीची जागा तक्रारदार सांगतील त्या व्यक्तीला देण्यासाठी 5 कोटी रूपये असे एकूण 8 कोटी रूपयाची लाच मागितल्याची तक्रार तक्रार यांनी दि.5/12/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दिली होती.

यातील तक्रारदार यांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 5/12/2025 रोजी लाच पडताळणी कारवाई केली असता त्यामध्ये आरोपी क्रमांक 2 भास्कर पोळ याने तक्रारदाराचे वरील काम करून देण्यासाठी स्वतःसाठी व आरोपी नंबर एक सध्याचे लिक्विडेडर देशमुख यांच्यासाठी तीन कोटी रूपये व लिलाव टेंडर प्रक्रियेमध्ये तक्रारदार सांगतील त्या व्यक्तीस टेंडर देण्यासाठी 5 कोटी रूपये असे एकूण 8 कोटी रूपयाची लाच मागून ॲडव्हान्स म्हणून 30 लाख रूपये मागितलेचे निष्पन्न झाले..

दिनांक 5 डिसेंबर रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान आरोपी लोकसेवक क्रमांक एक हे स्वतः शनिवार पेठेतील तक्रारदार यांच्या कार्यालयासमोर आले व तक्रारदाराकडे लाचेबाबत सकारात्मक बोलणी करून तक्रारदाराच्या वरील कामासाठी ॲडव्हान्स म्हणून 30 लाख रूपयाची लाच रक्कम आरोपी क्रमांक 1 व 2 यांनी 18:55 वाजता पंचासमक्ष स्वीकारली असता रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

वरील आरोपी अ.नं 1 व 2 यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरूद्ध विश्रामबाग पोलीस ठाणे, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. **9823167154**) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. **9029030530**) यांनी केले आहे.

1) **ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे)**, 9930997700 **(मुंबई)**
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट -** www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन ॲप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.